नियमीत फौजदारी खटला क्र. **१६३/२०२४**
निशाणी क्र. **९/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **गणेश सदानंद नाईक** |
| वय सुमारे | : | ४९ वर्षे, व्यवसाय : मजूरी |
| निवासस्थान | : | मु. म्हात्रोळी आदिवासीवाडी, ता. अलिबाग |

**सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत** :

मी अशिक्षीत आहे. घटना दि. ०१/१०/२०२४ रोजी झाली. मी मासे पकडण्यासाठी खाडीवर गेलो होतो. एका इसमाने मला माझा मुलगा मनोज नाईक याचा अपघात झाल्याचे सांगितले. सदरचा अपघात हा शहाबाज पेट्रोल पंप येथे झाला होता. एका ट्रकने त्याला धडक दिली होती. अपघातामध्ये माझा मुलगा मयत झाला. मी हॉस्पीटलमध्ये गेलो होतो व मला तेथे घटनेबाबत समजले होते. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. आता मला वाचून दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझा अंगठा आहे. त्यास **निशाणी क्र. पी—१** म्हणजेच **निशाणी क्र. १०** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. बी.जी. पाटील यांचेमार्फत** :

०२. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या किंवा माझ्या मुलाच्या नावावर मोटरसायकल नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाकडे मोटरसायकल चालवायचे लायसन नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी अपघात प्रत्यक्षात

पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, या अपघातात कोणाची चूक आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी ट्रक चालकाला स्वत: पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, ट्रकचालकाच्या चुकीमुळे अपघात झाला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा सरतपास दिलेला आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **०७/१०/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१६३/२०२४**
निशाणी क्र. **१६/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **दिपक नामदेव नाईक** |
| वय सुमारे | : | २० वर्षे, व्यवसाय : मजूरी |
| निवासस्थान | : | मु. म्हात्रोळी आदिवासीवाडी, ता. अलिबाग |

**सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत** :

०१. मी अशिक्षित आहे. घटना सन २०२४ मध्ये ०१ तारेखला झाली होती. महिना माझ्या लक्षात नाही. मी, मनोज नाईक व गणेश वाघमारे असे पेणला मंगळवार बाजारात जात होतो. आम्ही दुचाकीने जात होतो. त्यावेळी एच्.पी. पेट्रोल पंप, शहाबाज येथून अचानक डम्परचालक समोरुन वेगाने आला असता मनोज नाईक याने मोटरसायकल उजव्या बाजूला घेतली तरीही आमची मोटरसायकल डम्परच्या ड्रायव्हरच्या केबीनच्या बाजूकडील चाकाला जावून धडकली. धडकेमुळे मनोज नाईकच्या डोक्याला मार लागला व तो मयत झाला. गणेश वाघमारे याच्या डोक्याला लागले होते. त्याला संजीवनी हॉस्पीटल, वडखळ येथे दाखल करण्यात आले होते. मला उजव्या पायाला व कंबरेला लागले होते तसेच मला खरचटले होते. मला संजीवनी हॉस्पीटल, वडखळ येथे उपचाराकरीता दाखल करण्यात आले होते.

०२. गणेश वाघमारे याला नंतर मुंबई येथील हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. गणेश वाघमारे नंतर मयत झाला. डम्परचा क्रमांक एम्.एच्. ०४–२८९१ असा होता. मी संजीवनी हॉस्पीटलमध्ये दाखल असताना मला डम्पर

चालकाचे नाव चंद्रभूषण शहा असे असल्याचे समजले होते. मी आरोपीला पाहिले नव्हते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. बी.जी. पाटील यांचेमार्फत</u>** :

०३. मोटरसायकल कोणाच्या मालकीची होती त्याचे नाव मला माहीत नाही. मोटरसायकल मनोज नाईक चालवत होता. मला हे माहिती नाही की, मनोज नाईककडे गाडी चालवण्याचे लायसन होते की नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोटरसायकल चालवायची असेल तर लायसन लागते. हे म्हणणे खरे आहे की, मोटरसायकलवर फक्त दोन सीट बसू शकतात. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ट्रिपल सीट चाललो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मोटरसायकल फार जुनी होती.

०४. हे म्हणणे खरे आहे की, आमची गाडी डम्परला जावून धडकली होती. साक्षीदार सांगतो की, डम्पर अचानक समोरुन आला होता त्यामुळे आमची मोटरसायकल धडकली. शहाबाज पेट्रोल पंप ते म्हात्रोळी यातील अंतर मला आता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघात झाला त्यावेळी पावसाळ्याचे दिवस होते. हे म्हणणे खरे नाही की, पेणचा बाजार सायं. ६:०० ते ६:३० वाजता बंद होतो. हे म्हणणे खरे नाही की, आमची गाडी वेगात चालली होती. हे म्हणणे खरे आहे की, आमची गाडी पूर्णपणे तुटली होती. हे म्हणणे खरे आहे की, जोरात अपघात झाल्यामुळेच गाडीचे तुकडे पडतात.

०५. हे म्हणणे खरे नाही की, मनोज नाईक याला गाडी व्यवस्थित चालवता येत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, अपघात मनोज नाईकच्या चुकीमुळे झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझा काय जबाब घेतला होता हे मला माहीत नाही. मला माझा जबाब वाचून दाखवला नव्हता. हे म्हणणे खरे

नाही की, मनोज व गणेश हे माझे मित्र असल्याने मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **१२/०३/२०२६**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.